**पात्रता प्रमाणपत्र :**

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित कडून वीज पुरवठा वापरणाऱ्या वीज विशिष्ट ग्राहकाच्या वर्गवारीकरिता वीज दरात राज्य सरकार सवलत घोषित करू शकते. प्रचलित शासन निर्णयानुसार समुचित ग्राहक विहित नमुन्यात म्हणजे “परिशिष्ट अ” मध्ये संबंधित जिल्हयाच्या विद्‌युत निरीक्षक कार्यालयात पात्रता प्रमाणपत्राकरिता अर्ज करू शकतो.

पात्रता प्रमाणपत्राकरिता अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित जिल्हयाचे विद्‌युत निरीक्षक किंवा त्यांचे आधिपत्याखालील अभियंत्यामार्फत अर्जदाराच्या कारखान्याचे निरीक्षण करण्यात येईल. जर पात्रता प्रमाणपत्राकरिता योग्य आढळल्यास त्याबाबतचा प्रस्ताव निरीक्षण अहवालासोबत संबंधित अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्‌युत निरीक्षण मंडळ यांचे कार्यालयात विद्‌युत निरीक्षक कार्यालयाततर्फे सादर करण्यात येईल.

विद्‌युत निरीक्षक कार्यालयाद्‌वारे सादर करण्यात आलेल्या पात्रता प्रमाणपत्राकरिता प्रस्तावामधील कागदपत्राची पडताळणी केल्यानंतर त्रुटी नसलेले प्रस्ताव स्वयंस्पष्ट अभिप्रायासह मुख्य विद्‌युत निरीक्षक, उद्‌योग, उर्जा व कामगार विभाग, मुंबई यांचे कार्यालयास सादर करण्यात येईल.

जर समुचित ग्राहकाबाबतचा प्रस्ताव योग्य आढळल्यास मुख्य विद्‌युत निरीक्षक सदर ग्राहकाला पात्रता प्रमाणपत्र जारी करतील. संबंधित ग्राहक सदर पात्रता प्रमाणपत्र परवानाधारकाच्या संबंधित कार्यालयात सादर करतील. त्यानंतर शासन निर्णयानुसार परवानाधारकाकडून ग्राहकाच्या पुढील बिलिंग सायकल मध्ये वीज दरात सवलत देण्यात येईल.

**Eligibility Certificate:**

The state government can declare the concession in electricity rates of certain class of consumers who are using the electricity from Maharashtra State Electricity Distribution Company Limited ( MSEDCL). As per the prevailing Government Resolution (G.R.), the appropriate consumer may apply to the Electrical Inspector office of the concerned district for eligibility certificate in prescribed format i.e. “Appendix A”.

After the receipt of application from consumer for eligibility certificate, the inspection of consumer’s industry will be carried out by the Electrical Inspector of the concerned district or by his subordinate engineer staff. If found eligible for eligibility certificate, the proposal along with inspection report will be submitted to the office of Superintending Engineer of concerned regional electrical inspection circle by the Electrical Inspector office.

After verification of eligibility certificate documents submitted by the Electrical Inspector office, the proposal without defect is submitted to the of Chief Electrical Inspector office, Industry, Energy and Labour Department, Mumbai with self explanatory report.

If the proposal of appropriate consumer is found eligible, the Chief Electrical Inspector will issue the eligibility certificate to the consumer. The concerned consumer shall submit the eligibility certificate to the concerned office of the Licensee. The Licensee then as per G.R. starts the concession in electricity rate from next billing cycle of consumer.

# परिशिष्ट - अ

(विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D + क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकाच्या वीजदरात सवलत मिळणेसाठीच्या पात्रता प्रमाणपत्रासाठी अर्जदाराच्या अधिकृत लेटर हेडवर करावयाच्या अर्जाचा नमुना)

प्रति,

विद्युत निरीक्षक,
निरीक्षण विभाग,
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
.........................

विषय - औद्योगिक ग्राहकाच्या वीजदरात सवलत मिळणेसाठीच्या पात्रता प्रमाणपत्रासाठी अर्ज.

मी/आम्ही ............................. महावितरण कंपनीकडून वीजपुरवठा घेत असलेले औद्योगिक ग्राहक असून ग्राहक क्रमांक .............. आहे. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय क्र.संकीर्ण - २०१५/प्र.क्र.२३८/उर्जा-५ दिनांक २४/०३/२०१७ यातील परिच्छेद ४ मधील तरतुदीनुसार वीजदरात सवलत मिळण्यासाठी पात्रता प्रमाणपत्र मिळणेबाबत खालील तपशिलासह अर्ज करीत आहे/ आहोत. सदर अर्जातील सर्व माहिती खरी असून ती चुकीची आढळल्यास पात्रता प्रमाणपत्रासाठी मी अपात्र ठरेन याची मला माहिती आहे.

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव व कार्यालयीन पत्ता (दुरध्वनी क्रमांक व ई-मेलसह)
२. अर्जदाराच्या कारखान्याचा पत्ता (दुरध्वनी क्रमांक व ई-मेलसह)
३. स्ववीज उर्जा/ सहवीज उर्जा /एम्बेडेड स्वजीज निर्मीती केंद्राचा तपशील
   अ) वीज निर्मिती क्षमता ........... केव्हीए/कि.वॅट (जनित्र/टर्बोजनित्र यांची संख्या)
   ब) इंधनाचा प्रकार
   क) वीज निर्मिती केंद्राचे नकाशे मंजूरी क्रमांक (प्रत जोडावी)
   ड) वीज निर्मिती केंद्राच्या परवानगी पत्र क्रमांक (प्रत जोडावी)
   इ) वीज निर्मिती केंद्र जनित्र नोंदणी क्रमांक (प्रत जोडावी)
   ई) वीज निर्मिती केंद्र कार्यान्वित झाल्याचा दिनांक
   उ) वीज निर्मिती केंद्रातील वीज स्वतः साठी वापराची टक्केवारी
४. महावितरण ग्राहक क्रमांक (चालू महिन्याच्या देयकाची प्रत जोडावी)
५. महावितरण वीजपुरवठा जोडणी दिनांक
६. महावितरण वीजपुरवठा ग्राहक वर्गवारी
७. अर्जदाराचा कारखाना कुठल्या क्षेत्रात कार्यरत आहे.- (विदर्भ/मराठवाडा/उत्तर महाराष्ट्र/ D व D+)
८. शासन निर्णय –पीएमआय-२०१३/( CR-54)/DN-8 दिनांक०१/०४/२०१३ यातील परिशिष्ट १ च्या संबंधित पानांची प्रत नमुद केलेल्या (D व D+ क्षेत्रात असल्यास) – (सदर पत्राची प्रत जोडावी)
९. अर्जदार मुक्त प्रवेश ग्राहक आहे काय?
   तरी आपणास विनंती करण्यात येते की, मला/ आम्हाला पात्रता प्रमाणपत्र देण्यात यावे.

सहपत्रे -

अर्जदाराची सही व पदनाम